## मुख्य अधिक्षिका, मुलींचे वस्तिगृह,
## पदव्युत्तर शिक्षण संस्था,
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र.सअ/आस्था/मुअमुव/कंत्राटी अकु.का.मनुष्य/२७/२०२६. दि.२५/०५/२०२६.

### दरपत्रक सूचना

**विषय:** अहिल्या मुलींचे वसतिगृहपदव्युत्तर शिक्षण संस्था अकोला या वसतिगृहाकरीता ठेकेपद्धतीने बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ (अकुशलकामगार)पुरविण्याकरीता निविदा/दरपत्रक करणे बाबत.

या सुचनेद्वारे खलील नमूद केल्यानुसार अहिल्या मुलींचे वसतिगृह, पशिस, अकोला या वसतिगृहाकरिता सहकारी संस्था/ठेकेदार कंपनी इत्यादी या बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ (अकुशल कामगार)पुरविण्याकरीता निविदा/दरपत्रक या कार्यालयास दि.३०/०५/२०२६ रोजी ०३.०० वाजेपर्यंत सादर करावे.

| अ.क्र. | मनुष्यबळ | संख्या | कामाचा वेळ | दर प्रती महिना |
|---|---|---|---|---|
| ०१. | अकुशल कामगार (मजूर) | प्रति व्यक्ती | ८ तास | |

टीप : कार्यालयाच्या गरजेनुसार मनुष्यबळांची संख्या कमी अधिक होऊ शकते.

| Sr. No. | Particulars | Rate in Rs. Per month Unskilled Labours | Remarks (if Required) |
|---|---|---|---|
| 1. | Minimum rates Wages(Basic) | | |
| 2. | Special Allowance VDA(Variable Dearness Allowance) | | |
| | Total Minimum Wages (As per minimum Wages act) | | |
| 3. | ESIC (As per ESIC rule) Employer Contribution (4%) | | |
| 4. | EPF (As per Employees provident fund rule) Employer Contribution (13%) | | |
| 5. | Bonus (8.33%) | | |
| 6. | Leave encashment (1.5 days) | | |
| 7. | Labour Welfare Fund (4X6) Rs. 24/- for Six Months | | |
| | Total Amount (1+2+3+4+5+6+7) | | |
| 8. | GST if applicable | | |
| 9. | Service charges (as applicable) | | |
| | Total payable amount in Rs./Month | Seal & Sign of Labour Contract | |

नोट: उरोक्त नमूद केलेले दर हे किमान वेतन काद्यानुसार असावे, यापेक्षा कमी दर ग्राह्य धरण्यात येणार नाही, कंत्राटदारास लागू असल्यास इतर बाबी योग्य स्पष्टीकरण व कागदपत्रासह नमूद करू शकतात.

Chief Rector
Girls Hostel,
Dr. PDKV, Akola

**दर नमुना करतांना खालील दिलेल्या सूचना, शर्ती व अटी काळजीपूर्वक लक्षात घ्याव्यात.**

१. सहयोगी अधिष्ठाता,पदव्युत्तर शिक्षण संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत शासकीय शैक्षणिक संस्था/वसतिगृहमाधील कामे असल्यामुळे (GST Act Notification No. 12/2017 Central Tax (Rate) Dated 28/06/2017) मनुष्यबळ पुरविण्यासाठी GST लागू नाही.

२. निविदा दरपत्रके कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत स्वीकारले जातील. मुदतीनंतर येणारी निविदा दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

३. किमान वेतन अधिनियम १९४८ च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा व कामगार विभागाची अधिसूचना दि. ०८ ऑगस्ट, २०२४ मध्ये नमूद दराचे अवलोकन करावे.

४. दरपत्रके सिलबंद पाकिटात पाठवावीत. दरपत्रके या निविदा सूचनेचा संदर्भ क्र. नमूद करावा. निविदा दरपत्रकातील दर सर्व करासहित असावेत. दरपत्रकासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी, भविष्य निर्वाह, पॅन कार्ड, आधारकार्ड इ. प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

५. निविदा दरपत्रक मुख्य अधिक्षिका, मुलींचे वसतिगृह,डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या नावाने द्यावे तसेच पाकिटावर "कंत्राटी तत्वावर बाह्यस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्याकरिता दरपत्रक" असे नमूद करावे तसेच दरपत्रकदार मोबाईल नंबर नमूद करावा.

६. निविदा दरपत्रक ३१ मार्च, २०२७पर्यंत वैध राहील.

७. कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचे अथवा अस्वीकारण्याचे तसेच निविदा प्रक्रिया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नलिखित स्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

**अटी व शर्ती-**

१. जोडपत्र 'अ' (Annexure "A") मध्ये नमूद सर्व अटी व शर्ती.

२. सदर कामे कार्यालयीनदैनंदिनस्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे आठ तासांचे काम राहील.

३. कामाची मजुराची संख्या ६ ते ७ राहील. कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य नसल्यास परिस्थितीत पर्यायी व्यक्तीची व्यवस्था किंवा कामावर हजेरी लावण्याची जबाबदारी कंत्राटदारावर असेल.

४. सदर काम हे पूर्णतः ठेकापद्धती/कंत्राटी बह्यस्त्रोतामार्फतकरावयाचे असल्याकारणाने मजुरांच्या वरिष्ठतायादीतकामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोद होणार नाही व तसा कुठला हि दावा करता येणार नाही.

५. कोणत्याही कंत्राटीमनुष्यबळस कामावर ठेवणे वा काढून टाकणे हे संपूर्ण अधिकार मुख्य अधिक्षिका,मुलींचे वसतिगृह, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना असेल.

६. कामावरील कंत्राटीमनुष्यबळ अपघात विमा, महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधी इत्यादीबाबी व वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुराचे देय लाभ उपलब्ध करून देण्याची पूर्ण जबाबदारी सेवापुरविणाऱ्या कंत्राटदार/कंपनी यांची राहील.

७. कामावरील कंत्राटी मनुष्यबळाला शासन नियमानुसार वेतन देण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असेल. कंत्राटदाराने कामगारास अदा केलेल्या दरमहाE.P.F. गट विमा पावती वेतन व इतर देय लाभ भरल्याचे पावती दरमहादेणे बंधनकारक राहील. याशिवाय पुढील महिन्याचे वेतन देयक अदा करण्यात येणार नाही.

८. सदर नोंदणी मनुष्यबळ पुरविणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. नोंदणी प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे तसेच जी.एस.टी. नोंदणी असल्यास त्या संदर्भातील दस्तऐवज सोबत जोडण्यात यावे.

९. शासन नियमानुसार संस्थेचे आयकर कपात करण्याचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पदव्युत्तर शिक्षण संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

१०. मनुष्यबळ पुरविण्याचा परवान्याची सत्यप्रत

११. पॅन कार्ड, आधारकार्ड छायांकित प्रती तसेच प्रत्यक्षकामकरणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आधारकार्ड

१२. EPF नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत

१३. व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत

१४. ESIC नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत

१५. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत

१६. सहयोगी अधिष्ठाता,पदव्युत्तर शिक्षण संस्था, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला समितीने निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र कंत्राटदाराने सादर करावे.

१७. मागील वर्षी भरलेले म्हणजेच सन २०२४-२५ व २०२५-२६ आयकर भरलेल्या विवरण पत्राची सत्यप्रत, EPF, कंत्राटदाराने दरपत्रकात कंत्राटीकामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतुदीपेक्षा कमी रक्कम नमूद करू नये. थोडक्यात कृषि विद्यापीठ यांच्यासाठी निश्चित केलेले दर नमूद करावेत. तथापि कंत्राटदाराने कमिशन यावरच दरपत्रक निश्चित करण्यात येईल. किमान वेतन कायद्यानुसार कंत्राटी कामगारास वेतन देणे बंधनकारक राहील.

१८. बाल मजूर कायद्याचे पालन करणे सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१९. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारांचा पगार, रजा, ग्रॅज्युइटी, बोनस, विमा योजना, पी.एफ. व ई.एस.आय.सीइत्यादी सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाही अथवा कोणतीही जबाबदारी कार्यालय वा विद्यापीठाची राहणार नाही.

२०. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटीकामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनंदिनकामाच्या नोंदी इत्यादी नोंद वह्या ठेवणे व ते संबंधित अधिकाऱ्यांकडून तपासून घेणे बंधनकारक राहील व त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार/पुरवठाची राहील.

२१. कामगाराच्या वैयक्तिक खात्यात पी.एफ. विमा व इतर भरणा केलेले चलान प्रत्येकमहिन्याच्या पहिल्या आठवड्यात देयकसादर करते वेळीसादरकरणे बंधनकारक राहील.

२२. शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमांची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधी कोणतीही जबाबदारी कार्यालयाची किंवा विद्यापीठाची राहणार नाही.

२३. प्रत्येक मजुरांना कॉन्ट्रॅक्ट ॲक्टमधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असून कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

२४. कंत्राटी मजुरास काम करत असताना इजा, अपघात अथवा मृत्यू संभविल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदा. वीज, पाऊस, भूकंप, मशिनरी, प्राणी आणि वादळामुळे इजा, अपघात मृत्यू संभविल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याचा या कार्यालयाशी/विद्यापीठाशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

२५. कंत्राटी पद्धतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रॅक्ट/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास संबंधितांनाकरार रद्द करण्यात येईल व सुरक्षाअनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यानंतर कार्यालयाचा तसेच कोणत्याही विद्यापीठाच्या निविदा प्रक्रियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही.

२६. पुरविण्यात येणाऱ्या कुशल व अकुशल मजुरांचा ई.एस.आय.सी कंत्राटदाराने उतरविणे, बंधनकारक राहील. याबाबतची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२७. दरपत्रक मजूर झाल्यानंतर कंत्राटदाराने कठरवून दिलेल्या कामाच्या सर्व अटी व शर्तींचा नोटराईजकरारनामा रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर त्वरित करून द्यावा लागेल.

२८. कंत्राटदाराने काम अर्धवट/समाधानकारक नसल्यास सदर कामाचे भुगताण करण्यात येणार नाही.

२९. कामात कुचराई व हलगर्जीपणामुळे कार्यालयाचे झालेले नुकसानानुसार दंडासह कंत्राटदारास भरपाई करावी लागेल.

३०. दरपत्रक उघडल्यानंतर किमान वेतनापेक्षा जास्त मात्र तुलनेने लघुत्तम दर सादर करत्यांशी दराबाबतवाटाघाटीचे अधिकार निविदा समितीस राहतील.

३१. कोणतीही दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारने तसेच कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवण्यात आले आहेत.

३२. कार्यालयाकडून विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्येक वेतन पुढील पाच तारखेपर्यंत संबंधित मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई.एस.आय.सी.पी.एफ कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्याचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलाने प्रत्येक महिन्याच्या देयेकासोबत सादर करणे बंधनकारक राहील. देयकासोबत सादर न केल्यास देयक अदा करण्यात येईल.

३३. कामावर ठेवलेल्या मजुरांची हजेरी पत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. संबंधित कार्यालयाचे सहयोगी अधिष्ठ्ता/मुख्य अधिक्षिका केंव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील.

३४. किमान वेतन व वेतन प्रदान अधिनियामातील विहित दरानुसार विहित वेळी ठेकेदाराने मजूरांना वेतन द्यावे.

३५. कंत्राटदार यांच्याकडून वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राटी मजुरांचे काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करून विद्यापीठाकडे जमा केलेली अमानत रक्कम जप्त करण्याचा अधिकार विद्यापीठाचाराहील.

३६. किमान वेतन व कामगार अधिनियमातील तरतुदीनुसार येणारे उत्तरदायीत्व विचारत घेऊन विद्यापीठ परिपत्रक किमान वेतन दराचे अभिप्राय घेऊन दरपत्रकाचे दर ठरविले जातात तसेच ठेक्यापायी निम्यात येणाऱ्या कामगारांना किमान वेतन दराने देय रक्कम देणे बंधनकारक असल्याने प्राप्त झालेल्या दरापेक्षा कमी येणारे निविदा दर केवळ सर्वात कमी दराचे आहे म्हणून स्विकारले जाणार नाही नोंद कंत्राटदारांनी घ्यावी.

३७. कंत्राटदाराचे दर कमी आहे म्हणून त्यांनाच काम पुरविण्यात येईल असे होणार नाही तर जे कंत्राटदार किमान कायद्यांतर्गत वेतन व नियमानुसार दर देतील त्यांचे दर स्वीकारली जातील.

३८. कामानुसार मजूर पुरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील कामावर एखाद्या मजुरांचे काम कार्यालयात असमाधानकारक वाटल्यास त्यांचे जागी तत्काळ दुसरा मजूर बदलून द्यावा लागेल.

३९. इच्छुक दरपत्रक सादर कर्त्यांशी आपले दरपत्रक सादर करताना वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय/विद्यापीठ/कार्यालय यांचा आदेश/अधिसूचना परिपत्रकाने काटेकोरपणे पालण करणे तसेच किमान मूळवेतन विशेष भत्ता राहणीमान भत्ता भविष्य निर्वाह निधी व आवश्यक शासकीय सर्व कर समाविष्ट करून दरपत्रक सादर करणे निविदा सादर कर्त्यास बंधनकारक राहील.

४०. शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधित दरपत्रकात नमूद केलेल्या दरात काम करावयाची समर्थता दर्शविल्यास त्यांना काम देण्याचे हक्क कार्यालयाच्या समितीस राहतील तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या दरपत्रक धारकाने असमर्थता दर्शविल्यास तिसऱ्या

क्रमांकाला लघुत्तम दरपत्रक धारकाने प्रथम क्रमांकाच्या दरपत्रक धारकाच्या दरात काम करण्याची समर्थता दर्शविल्यास यांना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील.

४१. सदर कंत्राटदाराचे दर हे सन २०२६-२७ (३१ मार्च, २०२७) पर्यंत या वर्षाकरिता लागू राहतील आणि शासकीय नियमानुसार किमान वेतन कायद्यामध्ये होणारे बदल लागू राहतील.

४२. उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणारे कंत्राटदार निविदा प्रक्रियामध्ये भाग घेण्यास अधिकृत ठरतील.

मुख्य अधिक्षिका,
मुलींचे वसतिगृह

➢ प्रतिलिपी: प्रभारी अधिकारी(ARIS Cell) डॉ.पंदेकृवि, अकोला यांना सदर निविदा विद्यापीठ संकेत स्थळावर अपलोड करण्याकरिता अग्रेशित.